**MHPU200006572016**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६/०३/२०१६ | | |
| नोंदणी तारीख | : | १६/०३/२०१६ | | |
| निकाली तारीख | : | ०२/०७/२०२६ | | |
| कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | १० | ०३ | १६ |

| | |
|---|---|
| **घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात** | |
| **पिठासीन अधिकारी चंद्रमोहन मो. खारकर** | |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | ०२/०७/२०१६ |
| **नियमीत फौजदारी खटला क्रमांक** | १७८/२०१६ |
| **निशाणी क्रमांक** | १५ |
| **प्रथम खबर क्रमांक** | ५८/२०१५<br>भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ३४ अंतर्गत. |
| **पोलीस ठाणे** | रांजणगाव (एम.आय.डी.सी.), ता. शिरुर, जि. पुणे. |

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन** तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे रांजणगाव (एम.आय.डी.सी.),<br>ता. शिरुर, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | **श्री. एस. एम. आरणे, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | १. | **वैभव विवेकानंद झंझाड**<br>वय २९ वर्षे, धंदा– कॉन्ट्रॅक्टर,<br>रा. अण्णापुर, ता. शिरुर, जि. पुणे. |
| | २. | **वैभव तान्हाजी रासकर**<br>वय २८ वर्षे, धंदा. कॉन्ट्रॅक्टर,<br>रा. अण्णापुर, ता. शिरुर, जि. पुणे. |
| आरोपी तर्फे | | **विद्वान वकील श्री. एस.डी. हिलाळ** |

| **भाग “ब”** | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०१/०४/२०१५ ते ०२/०४/२०१५ |
| प्रथम खबरची तारीख | १४/०७/२०१५ |
| अंतीम आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | ०६/०३/२०१६ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०३/१२/२०१९ |
| पुरावा नोंदविणे प्रारंभ केल्याची तारीख | २१/०१/२०१९ |
| न्यायनिर्णयाची राखीव असलेली तारीख | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०७/२०२६ |
| गुन्हासाठी शिक्षा, असल्यास | काहीही नाही. |

## आरोपीचा तपशील.

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामिनाचा दिनांक | दाखल झालेले गुन्हे | दोषी किंवा निर्दोष | झालेली शिक्षा | संपरीक्षे दरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैभव विवेकानंद झंझाड | ३१/०७/२०१५ | –– | भा.द.वी.कलम ३७९ सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | वैभव तान्हाजी रासकर | ३१/०७/२०१५ | -- | भा.द.वी.कलम ३७९ सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

:: <u>न्या य नि र्ण य</u> ::

( जाहीर दिनांक – ०२/०७/२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे संपरिक्षा करण्यात आली.

०२. <u>अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्तपणे खालील प्रमाणेः</u>

दिनांक ०१/०४/२०१५ रोजी १९.३० ते दिनांक ०२/०४/२०१५ रोजी सकाळी ०६.०० वाजताचे दरम्यान मौजे गणेगाव खालसा गावचे हद्दीत रोडवरुन ता. शिरुर, जि. पुणे येथे आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांचे मालकीचे रक्कम रू.१,०५,०००/– इतक्या किमतीचे एक ट्रेमिकल मशिन व रक्कम रू.५०,०००/– रोख असा एकुण रक्कम रू.१,५५,०००/– चा माल फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरुन नेला. सबब, फिर्यादीने दिनांक १४/०७/२०१५ रोजी घटनेची फिर्याद दिली.

०३. फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपींविरूध्द गु.र.नं. ५८/२०१५ भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला.

गुन्हयाचा तपास पोलीस नाईक श्री. पी.एस. भगत, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवली, घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. आरोपींविरूध्द पुरावा मिळून आल्याने ठाणे अंमलदार शिरुर पोलीस ठाणे यांनी आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपींविरूध्द माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र.०३ लगत भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप नोंदवण्यात आला. तो त्यांना मराठी भाषेत वाचून दाखवला. आरोपींनी तो नाकबूल केला व संपरिक्षेस जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील साक्षीदार तपासले.

| भाग "क" | | | |
|---|---|---|---|
| **अ. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी** | | | |
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| अ.सा.क्र. १ | आनंद ज्ञानोबा शिंदे | पंच साक्षीदार | ०८ |
| अ.सा.क्र. २ | प्रफुल्ल शंकर भगत | तपासी अधिकारी | १२ |

| ब. बचाव पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

| क. न्यायालयाने स्वतः तपासलेल्या साक्षीदाराची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

**०६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग “क” | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** | | |
| **अ. क्र.** | **नि. क्र.** | **वर्णन** |
| १. | ०९ | पंच साक्षीदार यांची घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २. | १३ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | १४ | जप्ती पंचनामा |
| ४. | १५ | मुद्देमाल पावती |

**०७.** बचाव पक्षाने खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग “क” |
|---|
| **बचाव पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** |

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| :: नि रं क :: | | |

०८. न्यायालयाने स्वतः खालील दस्ताऐवजावर दाखल केले.

| भाग "क" | | |
|---|---|---|
| **न्यायालयाने स्वतः दाखल केलेल्या दस्तांऐवजाची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| **:: निरंक ::** | | |

०९. निशाणी १ वरील आदेशान्वये विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या संमतीने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१०. आरोपींचे फौजदारी प्रकिया संहिता, १९७३, कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन निशाणी क्र.१३ व १४ प्रमाणे नोंदवण्यात आलेले आहेत.

११. युक्तीवाद ऐकला. खालील निर्धारण बिंदु माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसे सहीत खालील प्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | निर्धारण बिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०१/०४/२०१५ रोजी १९.३० ते दिनांक ०२/०४/२०१५ रोजी सकाळी ०६.०० वाजताचे | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | दरम्यान मौजे गणेगाव खालसा गावचे हद्दीत रोडवरुन ता. शिरुर, जि. पुणे येथे आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांचे मालकीचे रक्कम रू.१,०५,०००/– इतक्या किमतीचे एक ट्रेमिकल मशिन व रक्कम रू.५०,०००/– रोख असा एकुण रक्कम रू.१,५५,०००/– चा माल फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरुन नेला ? | |
| ०२. | कोणता गुन्हा सिध्द होतो ? | **नकारार्थी** |
| ०३. | अंतिम आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता.** |

:: **कारणमिमांसा** ::

**१२.** वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांचे मालकीचे रक्कम रू.१,०५,०००/– इतक्या किमतीचे एक ट्रेमिकल मशिन व रक्कम रू.५०,०००/– रोख असा एकुण रक्कम रू.१,५५,०००/– चा माल फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरुन नेला असा अभियोगपक्षाचा आरोप आहे. सदरचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे.

**निर्धारण बिंदु क्रं १ करीता:**

**१३.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ नामे आनंद ज्ञानोबा शिंदे यांची साक्ष निशाणी क्र.०८ वर नोंदविलेली आहे. सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास पुरक व

सुसंगत असे कोणतेही कथन केलेले नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयीन परवानगीने सदर साक्षीदार यांचा उलटतपास घेतला. परंतु सदर साक्षीदार यांनी उलटतपासदरम्यान देखील अभियोगपक्षास पुरक व सुसंगत असे कथन केलेले नाही. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास कसल्याही प्रकारे सहकार्य करत नाही, सबब सदर साक्षीदाराचा पुरावा हा विश्वासार्ह ठरत नाही.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ नामे प्रफुल्ल शंकर भगत यांची साक्ष निशाणी क्र.१२ वर नोंदविलेली आहे. सदर साक्षीदार यांनी मौखिक पुराव्यात असे कथन केलेले आहे की, सदर साक्षीदार हे दिनांक ०३/०४/२०१५ रोजी रांजणगाव (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होते. सदर दिवशी ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र.५८/२०१५ हा दाखल केला. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक यांच्या तोंडी आदेशान्वये सदर गुन्ह्याचा तपास हा सदर साक्षीदार यांचेकडे आला. तपासकामी सदर साक्षीदार यांना फिर्याद व प्रथम खबर अहवाल ही कागदपत्रे प्राप्त झाली. तपासादरम्यान सदर साक्षीदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. जप्त मुद्देमाल हा मुद्देमाल कारकुन यांचेकडे जमा करुन मुद्देमाल पावती तयार केली. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**१५.** अभिलेखावरील मौखिक तथा कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.२ हे तपासी अधिकारी आहे. तपासी अधिकारी यांनी गुन्ह्यातील चोरी केलेले कॉक्रीट मशिन कोणाच्या मालकीचे आहे याबाबत कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही. सदरचे मशिन कोणी खरेदी केले होते व ते कोठुन खरेदी केले होते याबाबत तपास केलेला नाही. सदरचे तथाकथीत मशिन याचा मॅन्युफॅक्चरींग दिनांक आणि बॅच क्रमांक याबाबत देखील कागदपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाही. गुन्ह्यातील चोरीचा माल हा कोणी चोरुन नेतांना पाहिलेला प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे निष्पन्न झालेले नाही. तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याच्या तपासाकामी जप्त माल याबाबत योग्य तो तपास केलेला नाही असे दिसुन येते. सदर गुन्ह्याचा प्रत्यक्षदर्शी कोणीही साक्षीदार नाही. असे असतांना सदरचा गुन्हा हा आरोपींनीच केला हे सबळ पुराव्या अभावी सिध्द होत नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवुन देखील फिर्यादी, घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यांवरील दुसरे साक्षीदार व इतर प्रत्यक्षदर्शी अथवा स्वतंत्र साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार यांचा मौखिक पुरावा हा विश्वासार्ह नाही.

**१६.** प्रस्तुत प्रकरणात आरोपींना गुन्हयामध्ये ओढण्याकरीता आवश्यक असणाऱ्या बाबी अभियोग पक्ष सिध्द करत नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणेचा गुन्हा सिध्द

करण्यासाठी आवश्यक घटकांची पूर्तता केलेली नाही व सदरचा गुन्हा निसंशयरित्या आरोपीनेच केला, ही बाब सिध्द केलेली नाही. **सबब मी निर्धारण बिंदु १ याचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.**

**निर्धारण बिंदु क्रं २ करीता**:

**१७.** आरोपींविरूध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. सबब निर्धारण बिंदु क्र. १ प्रमाणेचा गुन्हा सिध्द होत नाही. म्हणुन मी निर्धारण बिंदु क्र. २ चे उत्तर नकारार्थी नोंदवले आहे. करीता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **सबब निर्धारण बिंदु क्र. ३ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.**

| | |
|---|---|
| | **:: आ दे श ::** |
| **०१.** | आरोपी क्र.१ व २ यांची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे दंडनीय गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **०२.** | आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे पूर्तता करावी. |

| | |
|---|---|
| ०३. | प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेला एक टेम्पो क्र.एम.एच–१२–जे.एफ.–३६१५ हा मुळ मालकास परत केला नसल्यास योग्य तपासणी करुन मुळ मालकास परत करण्यात यावा. तसेच जप्त ट्रेमिकल मशिन रक्कम रू.१,०५,०००/– ही योग्य मालकाची तपासणी करुन त्यास देण्यात यावी. योग्य मालक न मिळून आल्यास किंवा त्याने सदर मशिन न घेतल्यास सदरहू मशीनचा जाहीर लीलाव करुन येणारी रक्कम नियमाप्रमाणे शासन दरबारी जमा करण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2026.07.02 17:14:29 +0530

दिनांक: ०२/०७/२०२६.
स्थळ : घोडनदी.

**( चंद्रमोहन मो. खारकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (कोर्ट क्रं.३)
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे.

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करतो की, या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः– विठ्ठल म. घुंगरड, लघुलेखक (ग्रेड–३).

कोर्टाचे नावः–न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या. क्र.३), घोडनदी–शिरुर.

न्यायनिर्णय दिनांकः–०२/०७/२०२६.

अपलोड दिनांकः–०२/०७/२०२६.